REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017


# बहिणाबाईच्या कवितेतील शेतकरी जीवनाचे दर्शन

डॉ. वामन जाधव
मराठी विभाग , सहयोगी प्राध्यापक , मा. ह. महाडिक महाविद्यालय मोडनिंब.

## प्रस्तावना :

नव्या शतकाने जग झपाट्याने जवळ येत आहे. तेवढ्याच गतीने माणसातला माणूस दूर जात आहे. तो भौतिक सुखाच्या पाठीमागे धावू लागला आहे. पण खरे सुख त्याच्यापासून दूर चालले आहे. सध्या माणसातला माणूसपणा संपत चालला आहे. अशा अस्थिर असुरक्षित समाजव्यवस्थेला शतकापूर्वीच एका मानवतावादी कवयित्रीने एक प्रश्न विचारला होता, 'माणसा माणसा कधी होशील माणूस' नव्या शतकाचं स्वागत करताना तो प्रश्न आजही तेवढाच महत्त्वाचा अहे. अशा अखंड मानव जातीची वेदना आंतरिक तळमळीने आपल्या काव्यात शब्दबद्ध करणाऱ्या कवयित्रीचा जन्म जळगांवपासून दोन मैल अंतरावर असणाऱ्या असोदे या गावी नागपंचमीच्या दिवशी इ. स. १८८० मध्ये महाजन या घराण्यात झाला. वयाच्या तेराव्या वर्षी बहिणाबाईचा विवाह जळगांवच्या नथु चौधरी बरोबर झाला. मात्र बहिणाबाईना आपल्या वैवाहिक जीवनात फारसे सुख लाभले नाही. नियतीनं त्यांच सौभाग्य हिरावून घेतलं. ओंकार, सोपान, काही या तीन अपत्यांना घेऊन त्या कणखरपणे परिस्थितीला सामोऱ्या गेल्या. त्यांचा दुसरा मुलगा सोपानदेव यांनी आपल्या आईच्या काव्याचा हा अनमोल ठेवा प्र. के. अत्रे यांना भीत भीतच दाखविला. ते सोपानदेवांना म्हणाले, '' अहो हे बावनकशी सोनं आहे. महाराष्ट्रापासून लपवून ठेवणं हा गुन्हा आहे.' त्यांच्या प्रयत्नाने इ. स. १९५२ मध्ये बहिणाबाईचा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. त्याला अफाट लोकप्रियता मिळाली. त्यांना निसर्ग कन्या म्हटले गेले. पण खऱ्या अर्थाने त्या भूमिकन्या होत्या. त्यांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाला होता. शेतकरी जीवन त्यांनी अनुभवले होते. पाहिले होते. शेतकरी जीवनाचे खरे वास्तव त्यांच्या कवितेत पहावयास मिळते. रानात घरात श्रम करीत असताना स्त्री मनाला माहेरची आठवण सुखावत असते. बालपणी तुडवलेली शेतमळ्याची वाट तिच्या मनातून जाता जात नाही. सुख समृद्धीने नांदणाऱ्या शेतकरी कुटुंबातील माहेरचे वर्णन करीत असताना 'माहेरची वाट' या कवितेत त्या म्हणतात,

''माघे पोत्यातून गये
गव्हा–ज्वारीचे धार
पाखराचा जसे बेत
दोन खाई झाले गार''



वर्षभर काबाडकष्ट करणाऱ्या स्त्रीला सण आला की, माहेरची ओढ लागते. तिचे डोळे माहेरच्या वाटेकडे लागून राहतात. अशाच माहेरची ओढ लागलेल्या एका स्त्री मनाचे चित्रण त्यांनी 'हिराचं देणं' या कवितेतून केलं आहे. त्या म्हणतात,

''उभे शेतामध्ये पिक
ऊन वारा खात खात
तरसती केव्हा जाऊ
देव भुकेल्या पोटात''

शेतकरी कुटुंबातील स्त्रियांना घरातील कामधंदा आटपून त्यांना शेतमळ्यात राबावे लागते. कष्टाचा कितीही बोजा पडला तरी त्या तक्रार करीत नाहीत. 'सासुरवाशीन' या कवितेत कष्ट उपसणाऱ्या एका सासुरवाशीनीचे चित्र त्यांनी उभे केले आहे. त्या म्हणतात,

'उठ सासुरवाशी बाई
उठ जात शेती कामाचा किती घोर
तू गोठ्यामधील ढोर'

शेतकरी हा जगाचा पोशिंदा त्याला सर्वांची काळजी लागून राहते. त्यांच्यासाठीच तो दिवसात राबतो. मुलाबाळासारखे शेतीची साधने जपतो. मोघडा पाभरं तिफन चाकूर वरवर नांगर अशा शेतीच्या साधनावर व त्याच्या कार्यावर बहिणाबाईनी कविता लिहिली आहे. शेतीच्या जीवनानुभवाला काव्यबद्ध करण्याचे त्याचे सामर्थ्य अगाध आहे. त्या म्हणतात,

'मोट हाकितो एक
जीवी पोसतो कितीक
वसाडली मोट
करे धो धो धायन्यात
हुंदकत पाणी जसं तान्हं पायन्यात'

ताफ्यात ओसाडणाऱ्या मोटेच्या पाण्याचे किती सुंदर वर्णन केले आहे. पाऊस आणि शेतकरी याचे अतुट नाते आहे. रानातली कामे आटपून तो पावसाची वाट पाहतो. अचानक  धो धो कोसळणाऱ्या पावसाने त्याचे मन भरून येते. 'आला पाऊस' या कवितेत त्यांनी कुणब्याच्या मनातील भाव टिपला आहे. त्याविषयी म्हणतात,

'आता उगू देरे शेत
आला पाऊस पाऊस
वऱ्हे येऊ देरे रोप
आता फिटली हाऊस'

अशा शब्दात त्यांनी पावसाविषयी भावना व्यक्त केली आहे. शेतकऱ्याच्या जीवनातील पेरणी ही महत्त्वाची गोष्ट आहे. पावसाळी दिवसात आभाळात ढग येतात. वीज चमकू लागते. पावसाचे वारे वाहू लागते. 'पावशापक्षी येते व्हा पेरत'असे ओरडू लागतो. पाऊस पडावा असे शेतकऱ्याला मनापासून वाटते. पाभरी, मोघडी, रासणी ही पेरणीची साधने तो बाहेर काढतो. जमिनीला वाफसा आल्यावर तो योग्य वेळी पेरणी करतो.

'पेरणी पेरणी
अवघ्या जगाची कारनी
बोराची चारनी
कोटी पोटांची भरनी
पेरणी पाभरी, मौघा
झाडीत ती सडो
कवा बसोनी चौघडा'

पेरणीच्या दिवसात काळ्या आईची ओटी भरण्यासाठी शेतकऱ्याला घाई झालेली असते. 'पेरणी' या कवितेत शेतकऱ्याचे मन व त्यावेळेच्या त्याच्या भावभावना चित्रित केल्या आहेत.

शेतकरी एक दाना पेरतो आणि शंभर दाने घेतो ही किमया ईश्वराची आहे. याविषयी 'देव अजब गारोडी' या कवितेत त्या म्हणतात,

'कसे वाऱ्यानं डोलती
दाने आले गाडी गाडी
दैव गेलें रं उघडी
देव अजब गारोडी'

हिरवीगार दिसणारी पिकं पिवळी पडू लागतात. ती कापणीला आली आहेत. याची त्याला खात्री पटते. मग त्याला धान्याची रास दिसू लागते. त्याच्या मनातील हा आनंदी भाव 'कापणी' या कवितेत बहिणाबाईंनी टिपला आहे.

'पडे जमिनीला तडे
आली कापणी कापणी
तशी माझ्या डोयापुढे
उभी दान्याची माफनी'

पीक खळ्यात येऊन पडतात. मग मळणीला सुरूवात होते. मळणी लवकर व्हावी असे त्याला वाटते. तो पाय उचलण्यासाठी बैलाला विनवणी करतो.

'पाय उचल रे बैला
कर बापा आता घाई
चालूं दे रे रगडण
तुझ्या पायाची पुण्याई'

मळणी झाल्यानंतर त्याला उपनने करावयाची असते. त्यावेळी तो वाऱ्यासाठी अडून बसतो. अचानक येणाऱ्या वाऱ्यात त्याच मन मोहरून जातं अशा शेतकऱ्याच्या मनःस्थितीचे वर्णन त्यांनी 'उपननी'या कवितेत केले आहे. त्या म्हणतात,

'भिन भिन आला वारा
कोण कोणाशी बोलली?
मनं माझं हरखलं
पानं झाडाची हालली!'

कुणब्याच्या दारातली बैलाची जोड त्याच्या घरा-दाराचे वैभव. तोच सधन शेतकरी. तो आपल्या मुळाबाळांवर जेवढे प्रेम करतो तेवढंच प्रेम गुरा-ढोरांवर करतो. त्याच्या कष्टांच नेहमी तो कौतुक करतो. दिवसभर राबल्यावर त्याच्या पाठीवर मायेची थाप पडते.

'दिसे डोलदार ते खांदे रे
तसे सरीलाचे बांध
माझ्या बैलाची चालनी रे
जशी चपळ हरणावाणी'

नंदी शेतात राबतो तेव्हाच हिरवीगार पिके मळ्यात दिसतात. जमिनीला बी पेरल्यापासून ते धान्याच्या राशी घरी येईपर्यंत तो शेतकऱ्याबरोबर राबत असतो. अशा रात दिन कष्ट करणाऱ्या बैलाविषयी 'मोट हाकतो एक' या कवितेत त्या म्हणतात,

'दोन्ही नाडा समदूर
दोन्हीमधी झीज एक
दोन्ही बैलाचं ओळणं
दोन्ही मधी ओढ एक'

वर्षभर शेतकरी बैलापासून कामे करून घेतो पण पोळ्याच्या सणाला भार त्याच्या खांद्यावर देत नाही. हा कुणब्याचा नियम उलट यादिवशी तो हिरवा चारा खायला घालतो. त्याला सजवले जाते. शेतकरी त्याच्या पायाची पूजा करतो. यादिवशी प्राणीमात्राला त्रास देऊ नये म्हणून 'पोळा' या कवितेत त्या शेतकऱ्याला उद्देशून त्या म्हणतात,

'नका हेंडाळू बैलाले
माझं ऐका रे जरासं
व्हते आपली हाऊस
आन बैलाले तरास
आज पुजारे बैलाले
फेडा उपकाराचं देणं
बैला खरा तुझा मान
शेतकऱ्या तुझं रीन'

शेतमळ्यातील सुगी संपली की कामधंद्याचा ताण कमी होतो. मग कुठे स्त्रियांना विसावा मिळतो. पावसाळा सुरू झाल्यावर शेतीच्या मशागतीची कामे करावयाची आहेत. ही स्त्री मनाला ओढ लागून राहते. याचे चित्रण त्यांनी ‘अरबाजी’ या कवितेत केले आहे. त्या म्हणतात,

‘चार दिवस चार दिस
इसावल्या घरात जी
आहे पुढे आहे पुढे
शेतीची मशागत जी’

शेतकरी कुटुंबातील सासुरवाशीनीला घरातील कामधंदा आटपून शेतमळ्यातली कामे पहावी लागतात. रात्री अंथरूणाला पडले तरी कामाचा घोर तिला मागून राहिलेला असतो. तिला पहाटे उटण्याची घाई झालेली असते. याविषयी ‘सासुरवाशीन’ या कवितेत बहिणाबाई म्हणतात की,

‘ऊठ सासूरवाशीन बाई
ऊठ जातं शेती कामाचा किती घोर
तू गोठ्यामधलं ढोर’

जगाचा पोशिंदा शेतकरी रात दिन रानात राबतो. ऊन पावसाशी संघर्ष करतो. पण त्याचे दैन्य दारिद्र्य हलत नाही. कधी तो भाजी भाकरी खाऊन आपल्या झोपडीत सुखाने झोपतो तर कधी उपाशी पोटी राहतो. अशा शेतकऱ्याचे दैन्य दारिद्र्य त्यांनी ‘नयी दियामधी तेल’ या कवितेत चित्रित केलं आहे.

‘नयी दियामधी तेल
कशी अंधारली रात
तेल मिळे एकदाच
नेली उंदरानं वात

तर ‘चुला पेटता पेटेना’ या कवितेत बहिणाबाई म्हणतात,

‘पेट पेट धुकेला
किती घेसी माझा जीव
आरे विस्तवाच्या धनी!
कसे झालं तुले हीव!’

पंढरीचा विठ्ठल हा अवघ्या शेतकऱ्याचं दैवत. त्याची सावळ्या विठ्ठलावर अपार श्रद्धा. उठता बसता त्याचे नाव त्याच्या मुखात असते. शेतीच्या कोणत्याही कामाची सुरूवात त्याच्या नामाने होते. शेतकऱ्याचे विठ्ठलावर असणारे प्रेम त्यांनी ‘विठ्ठल मंदिर’ या कवितेत चित्रित केले आहे. त्या म्हणतात,

‘शेतामध्ये गळे घाम
हाडे मोडीसनी
आता घ्यारे हरीनाम
राया पोटासनी’

आषाढी, कार्तिकी एकादशी आल्या की, शेतकरी रानातील कामे बाजूला सारून तो पंढरीची वारी करतो. पंढरीच्या पांडुरंगाला मात्र तो मायबाप मानतो. हे मातीचे संस्कार तो विसरत नाही. याचे सुंदर चित्रण त्यांनी ‘पंढरीची दिंडी’ या कवितेत केले आहे.

‘कसे बसले घरात
असे जोडीसन मांडी
चला उचला रे पाय
आली पंढरीची दिंडी’

पण काही वेळेला दारिद्र्यामुळे शेतकऱ्याला पंढरीची वारी करता येत नाही. मग तो मनात कष्टी होतो. विठ्ठल हा आपल्या जीवाचा सखा त्याला आपण भेटलो नाही, ही खंत त्याच्या मनात राहते. त्याच्या मनातील हा भाव बहिणाबाईंनी टिपला आहे.

'अरे पांडुरंगा, तुझी
कशी भक्ती करू सांग
तुझ्या रूपा पुढे येत
आड सावकाराचं सोंग'

बहिणाबाईंनी काही स्फूट ओव्या रचल्या आहेत. त्यामध्येही शेतकरी जीवनचित्रण सुंदर आले आहे. रात दिन शेतकरी गुराढोरासारखा राबतो. त्याच्या घामाचा शिरकाव करतो तेव्हाच पिंक तरारून येतात. अशा काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्याचं वर्णन त्यांनी 'धरत्रिले दंडवत' या कवितेत केले आहे. त्या म्हणतात,

'काया काया शेतामंधी
घाम जिरव जिरव
तवा उगल उगल
कायामधून हिरवं!'

शेतातील कामे करताना श्रम हलके व्हावे म्हणून शेतकरी गीत गातो. मोट हाकताना त्याच्या या गीताला पाटातलं पाणी आणि मोटेच्या चाकाचा आवाज साथ देते. त्याचे वर्णन त्यांनी सुंदर केले आहे.

'भरली येहरे
मोट चाले भराभर
कशाले करतं
कनाचाक कुरकुरं'

इवली इवली रोपं मातीतून वर येतात. शेतकरी त्याची काळजी घेतो. पिक मोठी झाली की, हिरवीगार रानं भरून दिसतात. त्यावेळी तो आनंदीत असतो. त्याच्या मनातील आनंदी भाव बहिणाबाईंनी टिपला आहे. त्या म्हणतता,

'धर्ती वरली हिवय
गेली उडत उडत
अरे उडता उडता
झाली तिची आभाळात'

शेतमळ्यातली सारी कामं शेतकरी आटपून घेतो. मग त्याचे डोळे आभाळाकडे लागतात. मेघराजा त्याच्या हाकेला साथ देऊन धो धो कोसळतो. तेव्हा त्याच्या कष्टाचं सोनं होतं. बहिणाबाई म्हणतात,

'घाम गाळता शेतात
शेतकरी वरसला
तेव्हा कुठे आभाळात
मेघराजा बरसला!'

शेतात घाम गाळून पिके घेणारा शेतकरी इमानपणे काळ्या आईची सेवा करतो, शेवटाची राख ही आपल्या जमिनीत पडावी अशी त्याची इच्छा असते. बहिणाबाई याविषयी म्हणतात,

'शेतकऱ्या तुझं हाड
शेतामंधी रे पाडले
मुडीसनी झाली राख
तापी माईत पडले'

निसर्गाच्या सानिध्यात राहणारा शेतकरी अपार श्रद्धा ठेवतो. तो स्वभावाने सरळ साधे राहतो. त्याच्या स्वभावाचे सुंदर वर्णन बहिणाबाईंनी केले आहे. त्या म्हणतात,

'जसा बोलयतले कर्रय
तसा कामले करारी
स्वभावानं मन मोका
अयोध्याचा शेतकरी'

**शेतकरी जीवनाचे वास्तव चित्रण बहिणाबाईंच्या कवितेतून दिसून येते. शेतकरी जीवनाचा अनुभव त्यांनी लोकगीताच्या अंगाने मांडला आहे. त्यांनी खरी ग्रामीण कविता लिहिली आहे. बहिणाबाईंच्या शेतावरील कविता देवाच्या प्रार्थनेत संपते. त्यातून शेतकऱ्याची देवावरची श्रद्धा दिसून येते. बहिणाबाईंचे मन हे अस्सल शेतकऱ्याचे आहे. त्यातून त्यांची कविता अस्सल वास्तववादी झाली आहे.**

**संदर्भः–**

1. महाराष्ट्रातील समाज सुधारण्याचे इतिहास दिलपराज प्रकाशन पुणे.
2. ग्रामीण साहित्य प्रवाह आणि परिस्थिती स्नेहवर्दन प्रकाशन पुणे.
3. बहिणाबाईच्या कविता ज्योती पाटील स्नेहवर्दन प्रकाशन पुणे.